नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज


संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २६२ | Issue - 262 | वार बुधवार दि. ११ फेब्रुवारी २०२६ | Blow- Wednesday Date 11 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# अजित दादा परत येणार नाहीत, पुराव्यासह वाईट वेळ सांगितली

## अजित पवार यांचा अपघात नाही, १०० टक्के घात; रोहित पवार यांचा सर्वात मोठा दावा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या घटनेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी अजित पवार यांचा विमान अपघात होता की घातपात होता? या चर्चेवरही भाष्य केलं. अजित पवार यांच्यासोबत घा-तपात झाल्याचा संशय आपल्याला असल्याचं रोहित पवार म्हणाले. यावेळी रोहित पवार यांनी अपघाताच्या दिवसाच्या आधीच्या काही घटना सांगितल्या. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या २७ जानेवारीचे शेड्यूल का बदलले? असा प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केला. अपघाताची घटना ही २८ जानेवारीला घडली.पण त्याआधी २७ जानेवारीला वेळापत्रकानुसार अजित पवार संध्याकाळी मुंबईहून गाडीने पुण्याला येणार होते. ताफा देखील लागला होता. पण अजित पवार का निघाले नाहीत? असा प्रश्न रोहित पवार यांनी केला.

कॅबिनेटची बैठक झाल्यानंतर अजित पवार अधिकाऱ्यांना म्हणाले होते की, चार-पाच तास मी माझे कामे करणार आहे. माझ्या पक्षातील काही अधिकारी, नेते आणि कर्मचारी भेटणार आहेत. त्यानंतर संध्याकाळी आपण पुण्याला जाणार आहोत, असं अजित पवार म्हणाले होते. त्यादिवशी एक फार मोठे नेते अजित पवार यांच्या भेटीसाठी येणार होते. ते वेळत येणार होते पण त्यांना यायला उशिर झाला. ते उशिरा आल्यामुळे आणि चर्चा उशिरापर्यंत सुरु झाल्यामुळे अजित दादांचा वेळ त्यामध्ये गेला. संध्याकाळी पाच-साडेपाच वाजता गाडीने जाणार होते ते गाडीने जाऊ शकले नाहीत. त्यांना पर्याय राहिला नाही. त्यांना विमान बुक करावे लागले. त्यामुळे ७ वाजून १३ मिनिटाला दुसऱ्या दिवसाचं विमान बुक करावं लागलं, असं रोहित पवार यांनी सांगितलं.

पूर्व विदर्भात एक कुठले तरी नेते आहेत. तुम्ही दादांचे मोबाईल चेक करा, कुणाचा फोन होता ते मला माहिती नाही, पण मला जे कळालं आहे, सही करावीच लागते, फार महत्त्वाची फाईल आहे. ती फाईल कुठे आहे? हे जेव्हा बघितलं गेलं तेव्हा ती फाईल घरी नव्हती. ती फाईल अजित पवार यांच्या मंत्रालयाच्या कार्यालयात होती. अजित पवार कधीही मोकळी फाईट ठेवत नाहीत. पण अचानक ती फाईल तिथे होती. मग दादांनी ती फाईल मागवली. ती फाईल पोहोचेपर्यंत वेळ गेला. आपल्या पक्षाचा एक मोठा नेता बोलत असेल तर सही करावीच लागेल. मग दादांनी सही केली. ती फाईल सही करेपर्यंत वेळ गेला, असा दावा रोहित पवार यांनी केला.

याच्या खोलापर्यंत जायचं असेल तर आमच्यादेखील तिथे ओळखीची माणसं आहेत. आमच्याही जीवाभावाची माणसं तिथे आहेत. अजित पवार यांना मी जेव्हा भेटलो, त्यांचे शेवटचे जे तीन-चार महिने होते, त्या काळात मी अजित दादा आणि त्यांच्या बरोबरचे अधिकारी एकदम घट्टपणे एक फार महत्त्वाची चर्चा करायचो. ती करत असताना काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा विश्वास असल्यामुळे तिथे चर्चा काय चालली होती हा विषय केला तेव्हा तिथे चर्चा, कुठलेतरी राजकीय कन्सल्टंट कुणीतरी आ-हेत, त्यांचा कॉन्ट्रॅक्ट हा शेकडो कोटींचा आहे, तो आपल्याला कॅन्सल करावा लागतोय, कारण त्यांच्याकडून आपल्याला काहीच मिळत नाही. काहीच फायदा होत नाही. सात दिवसआधीसुद्धा बारामती हॉस्टेलला मी अजित पवारांना भेटलो होतो तेव्हा अजित पवारांनी काही लोकांना सांगितलं होतं, शहाणपणा करु नका. राजकारण आम्हाला शिकवू नका. राजकारण आम्ही कसं करायचं आहे ते माहिती आहे. सर्व्हे फक्त तुम्ही करा. अशी चर्चा तिथे झाली होती. त्यामुळे अजित पवार यांना उशिर झाला आणि अजित पवार यांना प्लॅन बदलावा लागला, असं रोहित पवार यांनी सांगितलं.

## सुनेत्रा पवारांनी स्वीकारला पदभार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर तेराव्या दिवशी त्यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा पदभार स्वीकारला आहे. २८ जानेवारीच्या सकाळी अजित पवारांच्या विमानाला बारामतीत अपघात झाला. या अपघातात पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

सुनेत्रा पवार आज बारामतीहून मुंबईत दाखल झाल्या. त्यावेळी त्यांच्या सोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष आणि राज्यसभेचे खासदार प्रफुल्ल पटेल, मुलगा पार्थ पवार होते. मुंबईत येऊन त्यांनी उपमुख्यमंत्रिपदाची सुत्रं हाती घेतली. यानंतर त्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीसाठी रवाना झाल्या. मुंबईत आल्यावर सुनेत्रा पवार सर्वप्रथम देवगिरी बंगल्यावर गेल्या. उपमुख्यमंत्रिपदी असताना अजित पवार याच बंगल्यात वास्तव्यास होते. आता हाच बंगला सुनेत्रा पवार यांना देण्यात आला आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सर्वप्रथम प्रभादेवीतील सिद्धिविनायक मंदिरात जाऊन बाप्पाचा आशीर्वाद घेतला. त्यानंतर त्या चैत्यभूमीला गेल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना वंदन करुन त्यांनी पक्ष कार्यालय गाठलं. अजित पवार यांच्या केबिनमध्ये जाऊन त्यांनी श्रद्धांजली वाहिली. यानंतर त्यांनी मंत्रालयात जाऊन अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, छत्रपती शिव-ाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.

अजित पवार सर्वाधिक काळ उपमुख्यमंत्री राहिले. नोव्हेंबर २०१० मध्ये ते पहिल्यांदा उपमुख्यमंत्री झाले.



## संपादकीय....

# वर्चस्वाला आव्हान

महत्त्वाच्या खजिन्याचा पुरवठा करण्यासाठी भारत सरकारने हालचाली सुरु केल्या आहेत. यासाठी भारत जागतिक स्तरावर आपला विस्तार करत असून भार-ताने ब्राझील, कॅनडा, फ्रान्स आणि नेदरलँड्ससोबत एक मोठे पाऊल पुढे टाकले आहे जेणेकरून आवश्यक खनिजांसाठी शेजारील चीनवरील अवलंबित्व कमी होईल. आवश्यक खनिजांच्या शोध, उत्खनन, प्रक्रिया आणि पुनर्वापरासाठी संयुक्त करार करण्यासाठी भारत या चार देशांशी चर्चा करत आहे. ऊर्जा संक्रमण आणि आवश्यक कच्च्या मालाच्या संपादनाच्या दिशेने भारताचा हा उपक्रम एक मोठे पाऊल मानले जात असून संयुक्त शोध, उत्खनन, प्रक्रिया आणि पुनर्वापरासाठी सौद्यांची चर्चा सुरु आहे. भारत सरकार या करारांद्वारे महत्त्वाच्या खनिजांचा पुरवठा सुरक्षित करण्यासाठी जागतिक स्तरावर प्रयत्न करत आहे. भारत विशेषतः लिथियम आणि दुर्मिळ पृथ्वी घटकांवर लक्ष केंद्रित करत असून भारत खनिज प्रक्रिया तंत्रज्ञानाचीही उपलब्धता शोधत आहे. सध्या दुर्मिळ पृथ्वीच्या प्रत्येक पैलूवर, उत्खनन, प्रक्रिया ते पुरवठ्यापर्यंत चीनचे वर्चस्व आहे. त्यामुळे भारत आपल्या प्रयत्नांमध्ये यशस्वी झाल्यास संपूर्ण पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. सध्याच्या जागतिक परिस्थितीत ड्रॅगनवरील जास्त अवलंबित्व भारतासाठी मोठ्या चिंतेची बाब आहे. भारत आधीच जागतिक स्तरावर महत्त्वाच्या खनिजांचा सक्रियपणे शोध घेत असून अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया आणि जपानसोबत करार केले आहेत आणि पेरू व चिलीसोबत व्यापक द्विपक्षीय करारांवर वाटाघाटी करत आहे, ज्यामध्ये महत्त्वाच्या खनिजांचा समावेश आहे.प्रगत खाणकाम आणि प्रक्रिया तंत्रज्ञानामुळे आजच्या काळात चीन अनेक खनिजांच्या जागतिक पुरवठ्यावर वर्चस्व गाजवत असून ऊर्जा प्रसारण वाढवण्यास आणि उत्सर्जन कमी करण्यासाठी भारताला विविध देशांशी संपर्क साधण्याची गरज आहे.

# गावासाठी उभा राहणारा माणूस कधीच संपत नाही...!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



गावच्या निवडणुकीत मी कमी पडलो असेन, पण माझं मन, माझं स्वप्न आणि माझं आयुष्य आजही माझ्या या गोगांव गावासाठीच आहे. रात्रींच्या रात्री जागून,गावाचं भलं व्हावं म्हणून पाहिलेली स्वप्नं,आज थोडी जखमी झाली असतील पण तुटलेली नाहीत. ज्यांनी मला मत दिलं, ज्यांनी मनाप-ासून साथ दिली, आणि ज्यांनी विरोधात उभं राहूनही माझा सन्मान राखला – सगळ्यांना मी नतमस्तक होऊन धन्यवाद देतो. आज मी हरलो आहे पण हे गाव हरू नये म्हणून माझं मन आजही लढत आहे.

या मातीसाठी मी स्वप्नं पाहिली, या रस्त्यांवर मी चाललो, आणि या लोकांसाठी मी स्वतःला विसरलो आज मत कमी पडली असतील, पण माझ्या भावना कमी पडल्या नाहीत. ज्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला, ज्यांनी नाव न बोलता साथ दिली, ज्यांनी शांतपणे म ाझ्यासाठी देवापुढे हात जोडले – त्यांचं ऋण मी कधीही फ ेडू शकणार नाही. आज माझ्या डोळ्यांत पाणी आहे, कारण स्वप्नं तुटली म्हणून नाही, तर गावासाठी पाहिलेलं भविष्य अजून अपूर्ण आहे म्हणून. आज मी सगळ्या गावाला हात जोडून, आज मी हरलो आहे पण या गावासाठी लढणारा माणूस आजही जिवंत आहे. या मातीवर मी रडलो आहे, या रस्त्यांवर मी स्वप्नं पेरली आहेत, आणि आज याच मातीवर उभा राहून मी मान खाली घालून उभा आहे मतदानात नाव हरलं असेल, पण माझं हृदय या गावाकडून कधीच हरलेलं नाही. ज्यांनी मला मत दिलं, ज्यांनी माझ्या डोळ्यात पाहून विश्वास ठेवला, आणि ज्यांनी विरोधात असूनही माझ्या माणुसकीचा सन्मान केला – त्या प्रत्येकाचं नाव माझ्या श्वासात आहे. आज माझा आवाज थर-थरतोय, पण माझा निश्चय अजू-नही ठाम आहे. पण गावासाठी उभा राहणारा माणूस कधीच संपत नाही. आज नाही जिंकलो, पण लक्षात ठेवा – जे गावासाठी जिवंत असतात, ते कधीच हरत नाहीत. डोळ्यांत अश्रू घेऊन एक शेवटचं आव्हान देतो –

राजकारण थांबवूया

माणुसकी जपुया

एकमेकांना तोडू नका, जोडूया

आपलं गाव आपल्याच हातांनी वाचवूया.

पण गावासाठी जिवंत अस-लेलं मन आजही तसंच आहे.

आज नाही जिंकलो,

पण गावावरचं प्रेम कधीच हरत नाही.

डोळ्यात अश्रू असले तरी

हृदयात गाव असलेला.

कदाचित आज माझ्या हा-तात ५० मतांचा लीड नाही,

पण गावासाठी धडधडणारा हा श्वास

आजही तसाच आहे.

आज मी सगळ्या गावाला

डोळ्यात पाणी आणून एक आव्हान देतो.मला हरवणं मान्य आहे,

पण गावाचं नुकसान मला कधीच मान्य नाही.आज नाही जिंकलो,

पण गावासाठी झटणं, बोलणं, लढणं

माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत थांबणार नाही.

आम्ही जिल्हा परिषद मध्ये ५७ मतांनी मागे असून पंचायत समिती मध्ये आम्हाला लीड दिलात त्याबद्दल सर्वांचे मनपूर्वक आभार, =ज

जनसेवेसाठी जीवन वाहून घेतलेला मी हुरळून न जाता त्याच जोमाने कामाला लागेल... विरोधक सुद्धा कामासाठी येऊ शकतात त्यांच्यासाठी ही माझी दारे खुली असतील....

हे गाव माझं आहे,आणि मी या गावाचाच आहे

**कळावे आपलाच जनसेवक**

**– प्रदीप अंकुश जगताप**

**उपाध्यक्ष – भाजपा –**

**अक्कलकोट**

# मुलाचे होते दुसऱ्या दिवशी लग्न, आगीत होरपळून आईचा मृत्यू; मुंबईतील हृदयद्रावक घटना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईतून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. विलेपार्ले परिसरात एका इमारतीत १३ व्या मजल्यावर आग लागली होती. या आगीमध्ये होरपळून एका महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घरात लग्नाची तयारी सुरू होती. मुलाच्या लग्नाच्या आदल्यादिवशीच आईचा मृत्यू झाल्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील पश्चिम उपनगरातील विलेपार्ले परिसरात सकाळी ही घटना घडली. या भागात असलेल्या सुविधा पर्ल नावाच्या १३ मजली इमारतीच्या सर्वात वरच्या मजल्यावर आग लागली होती. बांधकाम व्यावसायिक जीतू सत्रा यांचा हा इमारतीत फ्लॅट असल्याचं समोर आलं आहे. १३ व्या मजल्यावर अचानक आग लागली होती. या आगीत जीतू सत्रा यांच्या भावाच्या पत्नी गंभीर जखमी झाली होती. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केलं होतं. पण, संध्याकाळी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची बाब समोर आली आहे. तर जीतू सत्रा यांची मुलगी अनेरी ही सुद्धा आगीत गंभीर जखमी झाली आहे. सध्या अनेरीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, जितू सत्रा यांचा मुलाचं उद्या मंगळवारी लग्न होतं. त्यामुळे सर्व नातेवाईक त्यांच्या निवासस्थानी दाखल झाले होते.

# स्वेरीमध्ये ‘एआय व्हिजन २६: प्रोजेक्ट डेमॉन्स्ट्रेशन एक्स्पो’ संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस) मध्ये इन्स्टिट्यूशनच्या इन-ोव्हेशन कौन्सिल (आयआयसी) अंतर्गत इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग (इ अँड टीसी) या विभागाने आयोजित केलेला 'एआय व्हिजन २६: प्रोजेक्ट डेमॉन्स्ट्रेशन एक्स्पो' हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

आत्मनिर्भर भारताच्या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी सुसंगत राहून हा कार्यक्रम 'एआय सप्ताहा'चा एक भाग म्हणून साजरा करण्यात आला. या प्रोजेक्ट डेमॉन्स्ट्रेशन एक्स्पोने विद्यार्थ्यांना ‘विज्ञान आणि एआय-सक्षम संशोधन आणि विकास’ या संकल्पनेअंतर्गत स्वदेशी उपाय विकसित करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी स्वेरीचे माजी विद्यार्थी असलेले उद्योजक व स्पार्टन सोलर टेक्नॉलॉजीचे संस्थापक सूरज डोके हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. ‘कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) सामाजिक उपयोगासाठी तंत्रज्ञान समजून घेण्यास आणि विकसित करण्यास कशी मदत करू शकते? या विषयावर कंपनीचे संस्थापक सूरज डोके हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की ‘विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असताना केवळ कोडिंगपुरते मर्यादित न राहता, वास्तविक जगा-तील सामाजिक समस्या सोडवणारे तंत्रज्ञान निर्माण करण्यावर अधिक लक्ष केंद्रित करावे. स्पर्धेच्या युगात नवनवीन संकल्पनांना दिशा दिल्यास त्यातून निर्माण होणारे प्रकल्प हे जनतेला अधिक सक्षम करतील. यातून देशाचा विकास अधिक गतीने होईल. यासाठी विद्यार्थ्यांनी आपली निर्मिती देशाच्या हितासाठी करावी.’ असे सांगून आपल्या उद्योगाची माहिती देवून इतरत्र नोकरी करण्यापेक्षा आपला उद्य-ोग व्यवसाय कसा वाढेल आणि त्यातून इतरांना रोजगार कसा देता येईल याकडे त्यांनी लक्ष वेधले. या कार्यक्रमात २० हून अधिक संघांनी उस्फूर्त सहभाग घेतला, यामध्ये इंजिनिअरींग, फार्मसी, डिप्लोमा आणि एमसीए शाखांमधील प्रतिभावान विद्यार्थी एकत्र आले होते. या कार्यक्रमामुळे उद्योग,नावीन्य आणि पायाभूत सुविधांना भविष्यात चालना मिळणार आहे. यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संघांना त्यांच्या संशोधन प्रकल्पासाठी रोख पारितोषिक आणि प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले.



संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार व विभागप्रम ुख डॉ. नीता तळवळकर यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेला हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विभागातील विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन स्वरा तासगावकर यांनी केले तर आभार प्रा. महुआ बिश्वास यांनी मानले.

# येडोळा येथे माई रमाई आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील मौजे येडोळा येथे त्यागमूर्ती माई रमाई भिमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली.

येथील सिद्धार्थ युवा कला व क्रीडा मंडळ आणि रमाई महिला मंडळाच्या वतीने त्यागमूर्ती महामाता रमाई भिम राव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महामाता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन उपस्थित मान्यवरांचा हस्ते करून समता सैनिक दलांचे पुणे जिल्हा लेफ्टनंट कर्नल एम.डी. लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली सामुदायिकरित्या बुद्ध वंदना घेऊन



अभिवादन करण्यात आले.

या.प्रसंगी येथील रामचंद्र लोंढे, सुरेश लोंढे, देवानंद लोंढे, मारुती लोंढे, डॉ. सुरज लोंढे, अमित लोंढे,अंकूश लोंढे, प्रविण कांबळे सह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्राचार्य मनोज बिडकर यांनी केले मार्गदर्शन

# औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे सुरक्षित इंटरनेट दिवस (एआय) आर्टिफिशियल इंटेलिजन्स वापरासाठी जनजागृती कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : इंटरनेटच्या वापराबद्दल समाजामध्ये जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने या कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास उपस्थित एन आय सी अधिकारी रवी पवार, प्राचार्य मनोज बिडकर, श्री असरेड्डी, शिल्पनिरीक्षक नितीन भांगे, शिल्पनिरीक्षक श्री म स्करे, शिल्पनिरीक्षक अमित चव्हाण, गटनिदेशक म्हेत्रे मॅडम, गटनिदेशक श्री गोरेकर उपस्थित होते.

प्रथम प्राचार्य मनोज बिडकर यांनी इंटरनेटच्या सुरक्षित वापराबद्दल माहिती दिली त्यावेळी ते म्हणाले की, इंटरनेटचा वापर करतेवेळी फायदेही आहेत व तोटेही आहेत त्याबद्दल सर्वांनी त्या दृष्टीने जागरूक व्हावे. फसव्या लिंक वर पासून सावधान राहण्यास सांगितले. फसवे कॉल व त्याद्वारे ब्लॅकमेलिंग करून केली जाणारी आर्थिक फसवणूक याबद्दल प्रत्येक नागरिकांनी जागरूक राह-ावे. बँकेकडून वेळोवेळी सुरक्षेबद्दल माहिती उपलब्ध केली जाते कोणतीही बँक कोणत्याही खातेदाराला फोन करून त्यांची खाते विषयी माहिती विचारत नसतात किंवा ओटीपी मागत नसतात तसे कॉल जर आपल्याला येत असतील तर त्यासंबंधी साय बर टोल फ्री क्रमांक १९३० वर तात्काळ तक्रार नोंदवावी असे सांगितले.

एन आय सी अधिकारी रवी पवार यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स च्या वापराबद्दल माहिती दिली. त्यावेळी ते म्हणाले की संपूर्ण भारतात आजच्या दिवशी सुरक्षित इंटरनेट दिवस हा कार्यक्रम राबवला जात आहे. त्यानंतर इंटरनेटच्या जबाबदारीने वापर कसा करावा याबद्दल सर्वांनी प्रतिज्ञा केली.

इंटरनेटच्या दैनंदिन वापरा संबंधित पुढील काही मुद्दे सर्वांनी लक्षात घ्यावे.

■ इंटरनेट वापराचे फायदे

१. इंटरनेट म्हणजे जागतिक स्तरावर संगणक व इतर डिजिटल उपकरणांना जोडणारे एक विशाल जाळे नेटवर्क होय.

२. डिजिटल पेमेंट

३. ई लर्निंग

४. एंटरटेनमेंट

५. सोशल मीडिया

६. मेकॅनिझम टू रिपोर्ट सायबर क्राईम

■ इंटरनेट वापराचे तोटे

१. इंटरनेट वापराचे व्यसन,

२. मानसिक आरोग्य,

३. सामाजिक एकाकीपणा,

४. ऑनलाइन फसवणूक

५. सायबर थ्रेट,

५. OTP-UPI पिन फसवणूक,

६. ऑनलाइन शॉपिंग स्कॅम आणि डिजिटल अरेस्ट स्कॅम, यांपासून सावध रहाणे गरजेचे आहे. तरीसुद्धा धोका झाला तर संबंधित खाते फ्रीज करण्यासाठी व एटीएम क्रेडिट डेबिट कार्ड ब्लॉक करण्यासंबंधी बँकेला कळवावे, व नॅशनल सायबर क्राईम पोर्टल वर तात्काळ तक्रार नोंदवावी.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजे (AI) च्या दैनंदिन वापरा संबंधित माहिती

(AI) चा वापर आणि त्याचे फायदे

आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात वापरली जात आहे.

(AI) इमेज रिकग्निशनच्या म ाध्यमातून उत्पादन ओळखून त्यावर आधारित शिफारसी दिल्या जातात.

फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्यूब यांसारख्या सोशल मीडियावर तसेच नेटफ्लिक्ससारख्या प्लॅटफॉर्मवर आपल्या

आवडीप्रमाणे कंटेंट सुचवला जातो.

■ ॲमेझॉन, फ्लिपकार्टसारख्या शॉपिंग प्लॅटफॉर्मवर ग्राहकांच्या पसंतीनुसार उत्पादने दाखवली जा-तात.

■ AI मुळे समाजाला अनेक प्रकारे मदत होत आहे –

■ आरोग्य सेवा : आजारांचे लवकर निदान, उपचार नियोजन

कार्यक्षमता : वेळ व खर्च वा-चवणे, कामांची अचूकता वाढवणे

■ खरेदी : योग्य उत्पादनांची शिफारस

■ पर्यावरण : प्रदूषण नियंत्रण, नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन

■ शिक्षण : वैयक्तिक शिक्षण पद्धती, ऑनलाइन शिक्षण सुलभ करणे

■ AI आपल्याला तीच माहिती दाखवतो जी गुगल सर्च इंजिन वर उपलब्ध असते.

■ ख चा चुकीचा वापर

काही लोकांकडून ख चा गैरवापर होऊ शकतो, जसे की –

इतर लोकांची वैयक्तिक माहिती लोकेशन, संपर्क क्रमांक, पत्ता, फोटो शोधणे किंवा वापरणे



त्यांच्या गोपनीय माहितीचे उल्लंघन करणे

■ सायबर हायजिन (Cyber Hygiene) – सुरक्षिततेसाठी उपाय

सायबर सुरक्षेसाठी खालील सवयी अंगीकारणे गरजेचे आहे:

■ ई-मेल व इतर खात्यांचे पासवर्ड नियमितपणे अपडेट करणे

■ मजबूत पासवर्ड वापरणे

■ दोन-स्तरीय प्रमाणीकरण (Two Factor uthentication) सुरू ठेवणे

संशयास्पद लिंक व संदेशांपासून दूर राहणे

एवढ्या सगळ्या सुरक्षितता बाळगूनही आपल्याला जर धोका झाला तर सायबर क्राईम टोल फ्री क्रमांक (१९३०) वर तात्काळ तक्रार नोंदवावी असे सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# चार वर्ग, पण शिक्षक एकच! समतानगर, बोरीवली व भादाणे शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात !

## शासनाच्या धोरणालाच हरताळ; शिक्षकांअभावी जिल्हा परिषद शाळांतील शिक्षण व्यवस्थेची दुरवस्था

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत किमान दोन शिक्षक असावेत, असे स्पष्ट शासन धोरण असताना भिवंडी तालुक्यातील पडघा केंद्रातील समतानगर (बोरीवली) आणि भादाणे जिल्हा परिषद मराठी शाळांमध्ये या धोरणाचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे चित्र आहे. पहिली ते चौथीपर्यंत चार वर्ग असूनही केवळ एकाच शिक्षकावर संपूर्ण शाळा चालवली जात असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शिक्षकांच्या तीव्र कमतरतेमुळे या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर थेट परिणाम होत असून त्यांच्या शैक्षणिक भवितव्यावरच प्रश्नचिन्ह निमर्ण झाले आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ही स्थिती ओढावल्याचा आरोप पालक व सामाजिक संस्थांकडून केला जात आहे. समतानगर (बोरीवली) जिल्हा परिषद शाळेत ३१ विद्यार्थ्यांसाठी केवळ एकच शिक्षक, तर भादाणे शाळेत २४ विद्यार्थ्यांसाठी एकच शिक्षक कार्यरत आहे. पहिली ते चौथीपर्यंतच्या वर्गांसाठी तब्बल १४ विषयांचे अध्यापन, सर्व वर्गांचा अभ्यासक्रम पूर्ण करणे, शालेय पोषण आहाराची व्यवस्था, ऑनलाइन रेकॉर्ड भरणे, माहिती संकलन, उपक्रम राबवणे, प्रशासकीय व बँकेची कामे, सभा, प्रशिक्षण, निवडणूक कामकाज (बी एल.ओ) अशी असंख्य जबाबदाऱ्या एकट्या शिक्षकावर टाकण्यात आल्या आहेत. एकटा शिक्षक ही सारी कामे कशी पार पाडणार? असा सवाल आता शिक्षकांपासून पालकांपर्यंत उपस्थित केला जात आहे. या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधत लोकधारा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मिलिंद जाधव यांनी शिक्षक विभागाला दुसऱ्यांदा निवेदन देत पडघा केंद्रातील शाळांमध्ये तातडीने शिक्षक नेमण्याची मागणी केली आहे. विशेष म्हणजे, याआधीही वर्षभरापूर्वी शिक्षक उपलब्ध करून देण्यासाठी निवेदन देण्यात आले होते. समतानगर येथील नागरिकांनीही स्वतंत्रपणे प्रशासनाकडे मागणी केली होती. मात्र, आजही या शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता कायम असल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी आहे. दरम्यान, भिवंडी तालुक्यातील शिक्षक टंचाईबाबत गटशिक्षण अधिकारी संजय असावले यांनी धक्कादायक माहिती दिली आहे.

भिवंडी तालुक्यात सुमारे १७० शिक्षक, पदवीधर शिक्षक व मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत. दर महिन्याला दोन-तीन शिक्षक सेवानिवृत्त होत आहेत. सन २०१२ पासून शासनाकडून नियमित शिक्षक भरती झालेली नाही. तालुका बहुतांशी नॉन-पेसा क्षेत्रात असल्याने ३०८ जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

तर भादाणे जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका प्रियंका पवार यांनी एक-शिक्षकी शाळांची विदारक अवस्था मांडताना सांगितले की, एकच शिक्षक- तोच शिकवतो, तोच मुख्याध्यापक, तोच शिपाई, तोच बी.एल.ओ. एक व्यक्ती, अनेक भूमिका ! अशा परिस्थितीतही शाळेचा पट का वाढत नाही, असा दोष शिक्षकांनाच दिला जातो.

पडघा केंद्रातील ज्या शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता आहे, त्या शाळांमध्ये शिक्षकांची संख्या वाढविण्यात येणार का? की विद्यार्थ्यांचे भवितव्य असेच




धोक्यात राहणार? असा थेट सवाल आता पालक, शिक्षक व सामाजिक संघटनांकडून उपस्थित केला जात आहे. शासन व शिक्षण विभाग यावर कधी ठोस निर्णय घेणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# दुहेरी खून प्रकरणातील दोघांना अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरातील कुंभार गल्ली येथील दुहेरी खून प्रकरणातील सहा महिन्यापासून तपास सुरू होता परंतु आरोपी सापडत नव्हते. त्याचा तपास लागलेली पोलिसांना संशय आले होते. पोलिसांना त्याची कोण कुन कुन लागली होती.

प्रकरणाचा तपास लावून संशयित दोन आरोपींना आरोपी ही त्यांच्या परिसरातील असून दुहेरी हत्याकांड झाले असल्याचे चर्चा तेथील जाणकार सांगत होते . पंढरपूर शहरातील कुंभार गल्ली येथे राहणारे लखन जगताप व त्याचे आई सुरेखा जगताप यांची १५ जून २०२५ रोजी रात्री आठ वाजता दरम्यान खून झाला होता. सहा महिन्यापूर्वी अज्ञात व्यक्तीने खून केला होता. या घटनेमुळे पंढरपूर शहरांमध्ये खळबळ उडाली होती. सहा महिन्यापासून पोलीस याचा तपास करीत होते. मात्र यश मिळत नव्हते. पुन्हा पोलिसांनी यंत्रणा कामाला लावली.

**कुंभार गल्लीतील परिसरातील प्रतिष्ठित कुटुंबातील संशयित आरोप असल्याची चर्चा**

या प्रकरणातील दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी मोठ्या कुटुंबातील आहेत व त्यांना राजकीय वारसा असल्याची समजते. आरोपींनी मारल्याचे सांगितले. व त्यांना कोर्टाने पोलीस कोठडी देण्यात आले आहे. त्याचा पुढील तपास फुल विभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे एक करीत आहेत.

# विष्णुपद मंदिर परिसरात आपत्कालीन प्रसंगात भाविक मुलीचा जीव वाचविण्यात यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या अखत्यारीतील पंढरपूर शहरातील गोपाळपूर रोडवरील श्री विष्णुपद मंदिर परिसरात चंद्रभागा नदीपात्रामध्ये आज दिनांक १० फेब्रुवारी रोजी दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या मुलीबाबत घडलेल्या एका आपत्कालीन प्रसंगात मंदिरातील पुजाऱ्यांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळल्याची घटना घडली आहे.



करमाळा तालुका (सोलापूर जिल्हा) येथील रहिवासी कु. रोशनी भाऊ काळे ही भाविक मुलगी आपल्या कुटुंबासह श्री विष्णुपद मंदिर येथे दर्शनासाठी आली होती. दर्शनापूर्वी चंद्रभागा नदी पात्रात स्नानासाठी गेल्यानंतर सदर मुलगी पाण्यात बुडताना आढळून आली. सदर घटना तेथे उपस्थित भाविक व मंदिरातील पुजाऱ्यांच्या निदर्शनास येताच परिस्थितीचे गांभीर्य तात्काळ लक्षात घेण्यात आले. या वेळी मंदिरातील पुजारी संग्राम कुलकर्णी यांनी कोणताही विलंब न करता प्रसंगावधान राखून तत्काळ चंद्रभागा नदी पात्रात उडी घेत सदर भाविक मुलीस सुरक्षिततरित्या बाहेर काढले. त्यांच्या तत्पर व धैर्यशील कृतीमुळे वेळेत मदत मिळून भाविक मुलीचा जीव वाचविण्यात यश आले.

संग्राम कुलकर्णी यांनी दाखविलेली तत्परता, धैर्य व मानवतावादी भूमिका समाजासाठी अनुकरणीय असून त्यांच्या या स्तुत्य कार्यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला आहे. या घटनेबाबत भाविक, नागरिक तसेच विविध स्तरांतून त्यांचे कौतुक व अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेनंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके तसेच समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दूरध्वनीद्वारे पुजारी श्री. संग्राम कुलकर्णी यांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले आहे.

# शासकीय रुग्णालयामधील तपासणी व उपचार पूर्वीप्रमाणे नि:शुल्क

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय रुग्णालयामधील तपासणी व उपचार हे शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाच्या २३ ऑगस्ट २०२३ च्या शासन निर्णयान्वये अन्वये नि:शुल्क करण्यात आलेले असून ते आजही पूर्वीप्रमाणेच नि:शुल्क आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाने १६ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या नागरिकांच्या सनदेमधील परिशिष्ट-तीन मध्ये सेवा सुविधा पुरविण्यासाठी ६ जून २०१५ च्या शासन निर्णयातील शासन मान्य दर अनवधानाने समाविष्ठ झाले. प्रत्यक्षात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली शासकीय रुग्णालयामध्ये तपासणी व उपचार नि:शुल्क करण्यात आलेले असल्याने नागरिकांच्या सनदेमधील परीशिष्ठ-तीन हे ९ फेब्रुवारी २०२६ शुध्दीपत्रकान्वये वगळण्यात आले आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाने दिली आहे.

# डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालयमध्ये जिमखाना डे व पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला/प्रतिनिधी- शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी रोजी डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला मध्ये जिमखाना डे व पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिकंदर मुलाणी यांनी दिली आहे. शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ८:०० ते ९:०० वा. पारंपारिक वेशभूषा दिन साजरा होणार आहे. तसेच सकाळी ९:०० ते १०:०० वाजता फनी गेम्स, १०:०० ते ११:०० वाजता फॅन्सी ड्रेस स्पर्धा आणि ११:०० ते दुपारी २:०० वाजेपर्यंत पाककला, पुष्परचना, पोस्टर मेकिंग, मेहंदी, फोटो इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी २:०० ते ५:०० वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचा दुसरा दिवस म्हणजे रविवार दिनांक १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ८:०० ते १०:०० या वेळेत संगीत खुर्चीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सकाळी १०:०० ते ११:०० या वेळेत रांगोळी, हस्तकला, स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. मुख्य कार्यक्रम म्हणजे पारितोषिक वितरण सोहळा सकाळी ११:०० ते १:०० या वेळेत होणार असून या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध लेखिका व कवयित्री मा.प्रा.डॉ. सुनिता बोर्डे-खडसे या उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ. अनिकेत(भैय्या) देशमुख हे उपस्थित राहणार आहेत. तसेच संस्थेचे सचिव मा.श्री. विठ्ठलराव शिंदे व संस्थेचे सर्व संचालक मंडळ उपस्थित राहणार आहेत. दुपारी २:०० ते ५:०० या वेळेत शेलापागोटे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिकंदर मुलाणी, सांस्कृतिक विभागाचे चेअरमन प्रा.अशोक कांबळे, जिमखाना विभागाचे चेअरमन प्रा. विजय पवार, महाविद्यालयातील सर्व स्टाफ, विद्यार्थी, वियार्थीनी यांनी विशेष परिश्रम घेतले आहे.

# महा विस्तार शेतकरी ॲप शेतकऱ्यांपर्यंत कृषीज्ञान पोहचविण्यासाठी एक व्यासपीठ : जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : शेतकऱ्यांपर्यंत अधिकृत, विश्वासार्ह व आधुनिक कृषी ज्ञान पोहोचवण्यासाठी विकसित करण्यात आलेले 'महाविस्तार-ख (चरहरतखडढठ-ख) शेतकरी ॲप' हे एक सशक्त डिजिटल व्यासपीठ म्हणून पुढे आले आहे. पीक अवस्था निहाय मार्गदर्शन, स्थानिक हवामानावर आधारित सल्ला, कीड-रोगांचे पीकनिहाय इशारे तसेच एआय-सक्षम चॅटबॉटद्वारे संवाद अशी या ॲपची वैशिष्ट्ये असून, शेतकऱ्यांना अचूक सल्ला मिळण्यास मदत होत आहे.

महिला शेतकऱ्यांचा शेती व संलग्न कामांमधील सहभाग लक्षणीय असूनही, संस्थात्मक व सामाजिक अडथळ्यांमुळे त्यांना अनेकदा औपचारिक व विश्वासार्ह कृषी माहिती उपलब्ध होत नाही. ही बाब लक्षात घेऊन दि. १० ते १४ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राज्यव्यापी विशेष मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मोहिमेत प्रत्येक गावात जाऊन महिला शेतकऱ्यांना 'महाविस्तार-ख' ॲप डाउनलोड व वापरासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या अनुषंगाने महिला शेतकऱ्यांसाठी विशेष प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमात जमीन मालकी हक्क विचारात न घेता, शेती किंवा संबंधित कृषी कामात गुंतलेली कोणतीही महिला 'शेतकरी' म्हणून ग्राह्य धरली जाणार आहे. स्मार्टफोन नसलेल्या महिलांसाठी गट-आधारित प्रशिक्षण व प्रात्यक्षिकांद्वारे सहभाग सुनिश्चित करण्यात येणार आहे.

मोहिमेच्या यशासाठी कृषी ताई, कृषी सखी, पशु सखी, महिला बचत गट (डक्री) व विविध महिला संघटनांचा सक्रिय सहभाग घेतला जाणार आहे. महिला शेतकऱ्यांचा पुरेसा सहभाग मिळावा यासाठी गावपातळीवर आगाऊ प्रचार, पूर्वसूचना तसेच त्यांच्या दैनंदिन जबाबदाऱ्यांनुसार बैठकींच्या वेळा नियोजित केल्या जाणार आहेत. ॲपची वैशिष्ट्ये व चॅटबॉट वापर स्पष्ट करणारे लघु व्हिडिओ तयार करून विविध माध्यमांतून प्रसारित केले जाणार आहेत. तसेच क्षेत्रीय स्तरावर प्रात्यक्षिकांसाठी कृषी, विज्ञान व ग्रामीण विकास पार्श्वभूमी असलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मदत घेतली जाणार आहे.

गुगल प्ले स्टोअरवरून आजच 'महाविस्तार-ख' ॲप डाउनलोड करून शेतीतील डिजिटल क्रांतीचा भाग व्हावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

**भूमी अभिलेख कर्मचारी कृती समिती महाराष्ट्र राज्य यांचा निर्णय**

**मा. तहसीलदार अजित दिवटे यांना दिले निवेदन**

# राज्यातील सर्व भूमी अभिलेख विभागातील कर्मचारी जाणार संपावर, १८ फेब्रुवारीपासून करणार असहकार आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : भूमी अभिलेख विभाग (Land Records Department) हा राज्य प्रशासनातील अत्यंत महत्त्वाचा आणि पायाभूत विभाग आहे. ज्याची जमीन, त्याचा नकाशा आणि त्याचा अधिकार हे स्पष्ट करण्याचे काम हा विभाग करतो.

भूमी अभिलेख विभागातील भूकरमापक हे विभागाचे कणा मानले जातात. जमिनीची मोजणी करण्यापासून ते शासकीय दस्तऐवज अद्ययावत ठेवण्यापर्यंत त्यांची कामे अत्यंत तांत्रिक आणि महत्त्वाची असतात.

भुकरमापक पदाची शैक्षणिक पात्रता ही अभियांत्रिकी पदवी किंवा पदविका करण्यात आली असून या विभागातील सर्व कामे हे तांत्रिक स्वरूपाचीच आहेत. इतर विभागातील खासकरून वन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथील भुकरमापक पदांवरील कर्मचाऱ्यांना तांत्रिक वेतन देण्यात येत असून भुमिअभिलेख विभागांमध्ये मात्र कर्मचाऱ्यांना हे लिपिक वर्गीय वेतन देण्यात येत आहे. मा. न्याधिकरणाने ( मॅट) सुद्धा या कर्मचाऱ्यांच्या बाजूने निकाल देऊन ही शासनाने अजूनही या कर्मचाऱ्यांना तांत्रिक वेतनश्रेणी लागू केली नाही, त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे.

पुढील सर्व कामे भूमी अभिलेख मधील कर्मचारी करत असतात,

१. जमिनीची मोजणी,

दिवाणी न्यायालय मोजणी, कोर्टाच्या आदेशानुसार जमिनीच्या वादात मोजणी करणे,

हद्द कायम मोजणी, शेतकऱ्यांच्या अर्जावरून त्यांच्या जमिनीच्या सीमा (Boundaries) निश्चित करणे, फाळणी मोजणी: एकाच गट क्रमांकात अनेक हिस्सेदार असल्यास त्यांच्या वाटण्यांनुसार स्वतंत्र नकाशे तयार करणे.

२. तांत्रिक नकाशे तयार करणे

मोजणी केल्यानंतर जमिनीचा अचूक नकाशा तयार करणे.

सध्या आधुनिक यंत्रांच्या सहाय्याने (उदा. रोव्हर मशीन) मोजणी करून डिजिटल नकाशे बनवणे,

जमिनीच्या हद्दीवर खुणा निश्चित करणे.

३. नगर भूमापन (City Survey)

शहरी भागात (छेप-सीळर्लीश्रींीीरश्र श्ररपव) जमिनीची मोजणी करणे,

शहरांचे पुनर्रचित नकाशे तयार करणे आणि नगर भूमापन नकाशे (Sheet) अद्ययावत ठेवणे.

४. शासकीय योजनांसाठी मोजणी

महामार्ग, रेल्वे, धरणे किंवा सार्वजनिक प्रकल्पांसाठी जमिनीचे भूसंपादन (Land cquisition) करताना मोजणी करणे.

गायरान जमिनी किंवा शासकीय जमिनींच्या सीमा निश्चित करणे.

५. अभिलेख अद्ययावत करणे,

मोजणी झाल्यानंतर सातबारा उतारा किंवा मालमत्ता पत्रक (Property Card) मध्ये आवश्यक ते बदल सुचवणे.

कर्मचाऱ्यांनी आंदोलनाची रूपरेषा जाहीर केली असून ती पुढीलप्रमाणे,

१८ फेब्रुवारी २०२६ रोजी मोजणी साहित्य कार्यालयात जमा करून काळ्या फिती लावून कामकाज करणार आहेत,

२० फेब्रुवारी २०२६ पासून मोजणी काम बंद,

२३ ते २६ फेब्रुवारीदरम्यान सामूहिक रजा

२७ फेब्रुवारी रोजी पुण्यात जमाबंदी आयुक्त कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे.

मागण्या मान्य न झाल्यास २ मार्चपासून संपूर्ण राज्यात बेमुदत संप पुकारण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.



# नांदगाव जिल्हा परिषद गटात विकासाचे कमळ फुलले

## संविधान चौकात जंगी स्वागत; उमेदवारांचा केला सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : नुकतच पार पडलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीमध्ये तुळजापूर तालुक्यातील नंदगाव गट आणि दोन्ही गणातील भाजपा आरप-ीआय (आठवले),शिवसेना (एकनाथ शिंदे) राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा पवार ) व मित्र पक्ष महायुतीचे भाजपाचे





अधिकृत उमेदवार विजयी झाले असून या गटात विकासाचे कमळ फुलले आहे.

तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे कार्य कुशल लाडके आमदार राणाजगजीतसिंह पाटील उर्फ राणा दादा यांच्या नेतृत्वाखाली तुळजापूर तालुक्यातील नंदगाव जिल्हा परिषद गटातून भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार भाजपाचे निष्ठावान कार्यकर्ते सिद्धेश्वर कोरे उर्फ सिद्धू अण्णा यांनी कमळ या चिन्हावर विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढवली होती याच गटांतर्गत येणाऱ्या पंचायत समि ती नंदगाव गणातून भाजपाच्या सौ. रोहिणी विवेकानंद मिलगिरी तर खुदावाडी गणातून भाजपाचे भिवाजी इंगुले यांनी ही कमळ या चिन्हावर निवडणूक लढवली होती.

या निवडणुकीचा निकाल दिनांक ९ फ ेब्रुवारी २२६ रोजी लागला असून या निवडणुकीत नांदगाव गट आणि गणातील भाजपाचे उमेदवार प्रचंड बहुमताने विजयी झाले आहेत. त्यांच्या या विजयाबद्दल नळदुर्ग येथे रिपाइं सह भाजपा महायुतीच्या वागदरी,येडोळा, लोहगाव नळदुर्ग येथील कार्यकर्त्यांनी नळदुर्ग बसस्थानकासमोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर



संविधान चौकात जंगी स्वागत करून विजय उमेदवार सिद्धू अण्णा कोरे भिवाजी इंगोले आणि सौ रोहिणीताई मिलगिरी यांचा सत्कार केला.

# धाराशिव जिल्हा परिषदेत महायुतील स्पष्ट बहुमत, खासदार ओमराजेंना मोठा धक्का

## भारतीय जनता पार्टीने १९ जागा जिंकत सगळ्यात मोठा पक्ष ठरला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : राज्यभरातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांचे निकाल हाती आले आहे. धाराशिव जिल्हा परिषद (उ्हरीरिहळीं नझ एश्रशल-ींळेप) आणि पंचायत समितीच्या निवडणुकीचे निकाल हाती आले आहेत. धाराशिव जिल्हा परिषदेत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. १९ जागांसह भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर शिंदेंच्या शिवसेनेला १५ तर राष्ट्रवादी काँग्रेसला ६ जागांवर विजय मिळाला आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला पुन्हा एकदा धक्का बसला आहे. केवळ सात जागांवर सम ाधान मानावे लागले आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीला एकही जागा मिळाली नाही.

धाराशिव जिल्ह्यात तानाजी सावंत यांचा जिल्हा परिषदेच्या १३ पैकी आठ जागा जिंकत मतदारसंघात दबदबा कायम राहिला आहे. तर बंडखोरी करणाऱ्या धनंजय सावंत हे देखील विजयी झाले आहेत. जिल्ह्यात सर्वात मोठा दणका खासदार ओमराजे निंबाळकर व आमदार कैलास पाटील यांना बसला आहे. ४४ जागा लढवल्या होत्या, त्यांना केवळ जिंकल्या सात जागा मिळाल्या आहेत. ठाकरे सेनेच्या बालेकिल्ल्यात शिवसेना शिंदे गटाने मुसंडी मारली आहे.



धाराशिव जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून समाजवादी पार्टीच्या उमेदव-ाराने ही तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथे खाते उघडले आहे. तर भारतीय जनता पार्टीने १९ जागा जिंकत सगळ्यात मोठा पक्ष ठरला आहे. तर जिल्हा परिषद निवडणुकीत अपक्ष आणि ही जिंकल्या चार जागा काँग्रेसला केवळ तीन जागेवर समाधान मानावे लागले आहे.

धाराशिव जिल्हा परिषद चे निकाल हाती आले असून महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल आहे. १९ जागा जिंकत भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरला असून शिंदेच्या शिवसेनेला १५ जागा मिळाल्या आहेत, तर अजित पवारांचे राष्ट्रवादी देखील सहा जागांपर्यंत पोहोचली आहे. जिल्ह्यात एक खासदारांनी दोन आमदार असताना उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मात्र केवळ सात जागा जिंकता आल्या आहेत, तर काँग्रेसला केवळ तीन जागांवर समाधान मानव लागला असून शरद पवारांच्या राष्ट्रवादीला भोपळाही फोडता आला नाही. तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ घाटातून समाजवादी पक्षाने अनपेक्षित विजय मिळवून एकच धक्का दिला आहे. निवडणुकीत महायुतीला जरी भरघोस यश मिळाला असला तरी अध्यक्ष कोणाचा होणार? याकडे आता सर्वांचे लक्ष असणार आहे.

# तहसीलदारांचा रेशन विभागात 'ऑन द स्पॉट' निपटारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील रेशन कार्डासंदर्भात प्रलंबित कामे आणि धान्य वितरणातील तक्रारींची दखल घेत आज तहसीलदार अजित दिवटे साहेबांनी रेशन विभागाला अचानक भेट दिली. यावेळी कार्यालयात उपस्थित असलेल्या नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांनी प्रशासकीय अडथळे दूर केले आणि अनेक प्रश्न मार्गी ला-वले.



### नागरिकांच्या तक्रारींचे जागेवरच निवारण

**नेमकी कारवाई काय?**

गेल्या काही दिवसांपासून रेशन कार्डमध्ये नाव वाढवणे, कमी करणे किंवा नवीन रेशन कार्ड मिळण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी तहसीलदारांकडे प्राप्त झाल्या होत्या. याची गांभीर्याने दखल घेत आज दुपारी तहसीलदारांनी पुरवठा विभागाच्या कामकाजाची पाहणी केली.

अर्जांची पडताळणी: प्रलंबित असलेल्या अर्जांची फाईल तपासून संबंधित लिपिकांना तातडीने त्रुटी दूर करण्याचे आदेश दिले.

थेट संवाद: रांगेत उभ्या असलेल्या ज्येष्ठ नागरिक आणि म हिलांच्या अडचणी ऐकून घेतल्या.

शिस्तभंग कारवाईचा इश-ारा: कामात कुचराई करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कडक शब्दात समज देऊन कामात पारदर्शकता आणण्याच्या सूचना केल्या.

**नागरिकांना मोठा दिलासा**

तहसीलदारांच्या या सक्रियतेम ुळे अनेक नागरिकांचे रखडलेले प्रश्न अवघ्या काही तासांत सुटले. अधिकारी स्वतःहून आम च्यापर्यंत पोहोचल्यामुळे आम्हाला कार्यालयाचे चकरा मारण्यापासून सुटका मिळाली, अशी भावना यावेळी उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

> **प्रशासकीय कामात पारदर्शकता आणि वेग असणे अत्यंत गरजेचे आहे. रेशन विभाग हा थेट सामान्य जनतेशी निगडित असल्याने, येथे येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे काम नियम ानुसार आणि वेळेतच व्हायला हवे.**
>
> **– तहसीलदार अजय दिवटे**

# सोलापूर झेडपीचा अध्यक्ष कोण होणार? हे नावे आहेत चर्चेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट सोल-ापूर जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच भारतीय जनता पार्टीने स्पष्ट बहुमत मिळवले आहे ६८ पैकी ३८ जागा मिळवून भाजपने झेडपीवर वर्चस्व राखले आहे. त्यामुळे आता जिल्हा परिषदेचा अध्यक्ष कोण अशी चर्चा ऐकण्यास मिळते.

सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद हे ओबीसी सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव झाल्याने या ठिकाणी पुरुष किंवा महिला यापैकी कोणीही अध्यक्ष होऊ शकतो. त्याम ुळे अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पत्नी शांभवी कल्याणशेट्टी, भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंग केदार, भाजपचे ज्येष्ठ नेते रामप्पा चिवडशेट्टी, बार्शी-तील जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मदन दराडे यांच्या पत्नी भारती दराडे यांची नावे सध्या चर्चेत येऊ लागली आहेत.



शांभवी कल्याणशेट्टी या चपळ-गाव जिल्हा परिषद गटातून विजयी झाले आहेत. चेतनसिंह केदार हे सांगोला तालुक्यातून विजयी झाले आहेत. रामप्पा चिवडशेट्टी हे दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग जिल्हा परिषद गटातून विजय मिळवला. तर भारती दराडे या बार्शी तालुक्यातील उपळे दुमाला जिल्हा परिषद गटातून विजयी झाले आहेत.

३८ जागांपैकी बार्शीतून सहा, अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून सात, मोहोळ विधानसभा मतदारसंघातून सहा, मंगळवेढा ४, पंढरपूर ३, माढा ४, दक्षिण विधानसभा ३, माळशिरस २, करमाळा २ असे भाजपचे जिल्हा परिषदेमध्ये सदस्य निवडून आले आहेत.

जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार राजेंद्र राऊत, माजी आमदार दिलीप माने, माजी आमदार राजन पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, आमदार समाधान आ-वताडे, माजी आमदार राम सातपुते, आमदार सुभाष देशमुख, शहाजी पवार हे नेतेमंडळी एकत्रित चर्चा करूनच जिल्हा परिषदेचा अध्यक्ष पद कोणाच्या गळ्यात घालायचे हे ठरवतील. यामध्ये शांभवी कल्याणशेट्टी आणि चेतनसिंह केदार या दोघांना अध्यक्षपदाची सर्वाधिक संधी असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

# माई रमाईच्या त्यागामुळेच महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना दलित उद्धारासाठी आणि राष्ट्रहितासाठी काम करण्याची संधी मिळाली : राजकुमार गजदाने

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी /एस.के.गायकवाड : बाल वयातच आई-वडिला विना पोरकी झा-लेली माई रमाई भिमराव आंबेडकर यांनी आपल्या जिवनामध्ये खूप मोठा त्याग केला. फार मोठे कष्ट सोशिले प्रसंगी शेन गोवऱ्या थोपल्या, लाकडाच्या मोळी विकून आपला संसार भागविला आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्यात बाबासाहेबांना समर्थ साथ दिली अशा त्याग मूर्ती माई रमाई आंबेडकरांच्या त्यागामुळेच महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर उपेक्षित दलितांच्या उध्दारासाठी,महिला, शेतकरी कष्टकरी कामगारांच्या न्याय हक्कासाठी आणि राष्ट्रहिताकरिता काम करू शकले व देशातल्या तमाम नागरिकांना त्यांचे मानवी हक्क मिळवून देणारे भारतीय संविधान देशाला देऊ शकले असे गौरवशाली उद्गार चपळगाव तालुका



अक्कलकोट येथील भिमशाहीर राजकुमार गजदाने यानी वागदरी ता.तुळजापूर येथे बोलताना काढले.

मातोश्री रमाई आंबेडकर महिला मंडळ वागदरी ता.तुळजापूर व समस्त बौद्ध बांधवांच्या वतीने वागदरी येथे त्यागमूर्ती रमाई आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंती निमित्ताने अभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी भिमशाहिर राजकुमार गजदाने प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गा-वचे विद्यमान सरपंच सौ.तेजाबाई शिव-ाजी मिटकर ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून येथील ज्येष्ठ कार्यकर्ते मार्गदर्शक शिवाजी मिटकर गुरुजी, सेवानिवृत्त पो-लीस हवालदार संदिपान वाघमारे, भिम शाहीर राजकुमार गजदाने आधी होते.या प्रसंगी रिपाइं (आठवले ) चे धाराशिव जिल्हा सचिव तथा पत्रकार एस.के. गायकवाड यांचेही मार्गदर्शनपर भाषण झाले. प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध,महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यागमूर्ती माई रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन उपस्थित म ान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी शालेय विद्यार्थीनिनीने रमाई च्या गीतावर सामुहीक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी जेष्ठ कार्यकर्ते दत्तू नाना वाघमारे, कुंडलिक वाघमारे, उत्तम झेंडारे,अनिल वाघमारे,महादेव वाघमारे, शिवाजी वाघमारे,दत्ता झेंडारे,सूर्यकांत वाघमारे,दीपक वाघमारे,सत्यपाल वाघम ारे, हनुमंत वाघमारे,उज्वला वाघमारे, श्रीदेवी वाघमारे, वंदना वाघमारे,कविता गायकवाड, गेंदाबाई बनसोडे,ठकुबाई वाघमारे,गीताबाई झेंडारे, प्रमिला वाघम ारे,रेखाबाई झेंडारे,शुष्मा वाघमारे,कमल धाडवे,सह महिला युवा कार्यकर्ते ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी पंचशिल गायण पार्टी वागदरीच्या भिमगित गायणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**जि.प.च्या आठ गटातून शिवसेना २ भाजपा ४ तर शिवसेना उबाठा २ जागेवर विजयी**

**पंचायत समितीची सत्ता कोणाकडे येणार हे टॉस वर ठरणार**

# कळंब तालुक्यातून पंचायत समितीसाठी महायुती व उबाठाला फिफ्टी-फिफ्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब /प्रतिनिधी : जिल्हा परिषद पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद ८ गट व पंचायत समिती १६ गणासाठी चुरशीचे मतदान झाले होते , आज झालेल्या मतमोजणीत जि .प. च्या ८ गटातून शिवसेना शिंदे पक्षाने ईटकुर, डिकसळ २ जागेवर विजय मिळवला तर भारतीय जनता पक्षाने मंगरूळ , नायगांव , खामसवाडी, येरमाळा ४ जागा व विरोधी पक्ष नेते उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाने शिराढोण व मोहा या २ गटातून यश मिळविले तर कळंब पंचायत समिती १६ गणातून महायुती घटक पक्षाला ८ तर यामध्ये भाजपा ५ शिवसेना शिंदे ३ जागा व शिवसेना उबाठा पक्षाने ८ जागेवर विजय मिळवला असून , यश फिफ्टी- फिफ्टी ठरले आहे. पंचायत समितीची सत्ता कोणाकडे येणार हे टॉस वर ठरणार आहे.

या निवडणुकीत खासदार ओम राजे निंबाळकर व धाराशिव कळंब चे आमदार कैलास दादा घाडगे पाटील व भाजपा कडून आमदार राणा जगजितसिंह पाटील, यांनी आपली ताकद पणाला लावली होती. जि.प. गटातील विजयी उमेदवार व त्यांचे पक्ष ईटकुर अनंत लंगडे शिवसेना ६९४३ ,पल्लवी बळवंत तांबारे उबाठा ४८६१ शिवसेनेचे अनंत लंगडे २०८२ मतांनी विजयी, मंगरूळ , जयवंत कुंभार भाजप ६२००, बालासाहेब जाधवर उबाठा ५३१३. भाजपचे जयवंत कुंभार ८८७ मतांनी विजयी, डिकसळ, पूजा शिंदे, शिवसेना ५९५३, वर्षा मस्के ४५५७ ,शिवसेनेच्या पूजा शिंदे १३९६ मतांनी विजयी , शिराढोण , कांचनवाला सांगवे, उबाठा ४८८८, नितीन यादव ४८५३ राष्ट्रवादी श.प. शिवसेना उबाठा पक्षाच्या कांचनमला सांगवे ३५ मतांनी विजयी,नायगांव उद्धव शितोळे भाजपा ५३२२, अनिल साळुंखे उबाठा ५२०९ , भाजपचे उद्धव शितोळे ११३ मतांनी विजयी. खामसवाडी विश्वास कोकणे भाजपा ४०३० , मनीषा वाघमारे ३५७१ उबाठा , विश्वास कोकणे भाजपाचे ४५९ मताने विजयी, मोहा रूपाली नागटिळक उबाठा ५४९६, सुजाता मडके अपक्ष ४१२१ उबाठाचे रूपाली नागटिळक १३७६ मतांनी विजयी, येरमाळा अनुजा कोकाटे भाजपा ६८७१ , सुनंदा वाघमारे,५५२१ , भाजपाच्या अनुजा कोकाटे १३५० मतांनी विजयी ,कळंब पंचायत समिती सोळा गणा-तुन विजय झालेले उमेदवार व त्यांचे पक्ष ईटकुर रामचंद्र सांगळे,भाजप २६८५, बाबासाहेब कोठावळे अपक्ष २६२६, भाजपचे रामचंद्र सांगळे ५९ मतांनी विजयी, मस्सा खंडेश्वरी राज-श्री वरपे शिवसेना ४११२, तुकाराम थोरात उबाठा ३६५५, शिवसेनेच्या राजश्री वरपे ४५७ मतांनी विजयी, मंगरूळ प्रणिता चव्हाण भाजपा ३४२० शारदा गायकवाड उबाठा ३१३० , भाजपच्या प्रणिता चव्हाण २९० मतांनी विजयी, हसेगांव केज राणी राऊत शिवसेना ३३६१, लक्ष्मी तोडकर उबाठा ३३१८, शिवसेनेच्या राणी राऊत ४३ मतांनी विजयी, डिकसळ नामदेव जाधव शिवसेना २४८७ सचिन काळे उबाठा २४५६, शिवसेनेचे नामदेव जाधव ३१ मतानी विजयी, लोहटा पूर्व इंदुबाई ओव्हाळ भाजप ३८०७ सोनाली झोंबाडे उबाठा २६१० भाजपाच्या इंदुबाई ओव्हाळ ११९७ मतांनी विजयी, शिराढोण गजानन माकोडे भाजपा २२८८ , ज्ञानेश्वर खडबडे उबाठा १८१५ , भाजपचे गजानन माकोडे ४७३ मतांनी विजयी, जवळ खुर्द उबाठा ३२५८ , पांडुरंग घोगरे शिवसेना २०५८ , उबाठाचे मनोज घोगरे १२०० मतांनी विजयी, नायगांव सीमा टेकाळे उबाठा , १९८२ मनीषा टेकाळे १९२४ उबाठाच्या सीमा टेकाळे ५८ मतानी. विजयी , रांजणी यो-गेश्वरी पवार उबाठा २३७१, मनीषा देशमुख शिवसेना २१५८, उठाच्या जोगेश्वरी पवार २१३ मतांनी विजयी, खामसवाडी सुवर्णा पाटील उबाठा २२०० , किरण पाटील भाजप १९६४ उबाठाच्या सुवर्णा पाटील २३६ मतांनी विजयी, देवळाली उमाकांत एडके उबाठा २१७७ सचिन एडके शिवसेना २०३४ उबाठाचे उमाकांत एडके १४३ मतांनी विजयी, मोहा अनुराधा दिघे उबाठा २९७२ पूजा नागटिळक अपक्ष १८६२, उबाठाच्या अनुराधा दिघे १११० मतांनी विजयी, गौर श्याम देशमुख उबाठा ३०६२, लालासाहेब देशमुख भाजप २१६८, उबाठाचे श्याम देशमुख ८९४ मतांनी विजयी, येरमाळा वृषाली पाटील उबाठा ४१७५, उषाबाई बारकुल भाजपा ३६५५ उबाठाच्या वृषाली पाटील ५२० मतानी विजयी ,चोरा-खळी आलका खुणे, भाजपा २४३८, शिल्पा ओव्हाळ उबाठा २३४३ भाजपच्या अल्का खुणे ९५ मतांनी विजयी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे व सहाय्यक निवडणूक अधिकारी तहसीलदार हेमंत ढोकले यांनी काम पाहिले तर पोलीस निरीक्षक अजित चिंतले यांनी पोलीस बंदोबस्त चोख ठेवला होता.